# चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

क्रमांक : चंशमनपा/आ.वि./आरसीएच/७९९/२०१८ दिनांक : १६/०१/२०१८

## राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान

### मनपा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, चंद्रपुर

## -: जाहीरात :-

चंद्रपूर शहर महानगरपालिका – मनपा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण संस्था, चंद्रपूर अंतर्गत राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) करीता एकत्रित मानधनावर कंत्राटी पध्दतीने प्रस्तुत जाहीरातीत नमूद केल्याप्रमाणे पदांची शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पूर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडुन https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

### ऑनलाईन अर्ज भरण्यासंबंधी वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज सुरु होण्याचा दिनांक | १८ जानेवारी २०१८ |
| २ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | २९ जानेवारी २०१८ |
| ३ | संगणकीय चलनाव्दारे स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या शाखेमध्ये फी स्विकृतीचा कालावधी | ३० जानेवारी २०१८ |

**१) पदाचे नाव, पदसंख्या, शैक्षणिक पात्रता, मानधन, आरक्षण व आवश्यक प्रमाणपत्रे खालीलप्रमाणे:**

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वय | प्रवर्गानुसार आरक्षण | एकत्रित मानधन | अर्जासह सादर करावयाचे प्रमाणपत्र / दाखले |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | वैद्यकिय अधिकारी (बालरोग तज्ञ) (अर्धवेळ) | ०२ | किमान अर्हता – MBBS, MD (Paed) / DCH<br>तांत्रिक अर्हता – महाराष्ट्र मेडिकल काउन्सिल नोंदणी आवश्यक. अनुभव असल्यास प्राधान्य. | – | – | रु. २०००/- प्रती भेट/सत्र | • पदव्युत्तर पदवी /पदविका प्रमाणपत्र व गुणपत्रिका*<br>• महाराष्ट्र मेडिकल काउन्सिल रजिस्ट्रेशनचे प्रमाणपत्र<br>• अनुभव प्रमाणपत्र |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | वैद्यकिय अधिकारी (स्त्रीरोग तज्ञ) (अर्धवेळ) | ०६ | किमान अहर्ता - MBBS, MD (Gynaec) / DGO तांत्रिक अहर्ता - महाराष्ट्र मेडिकल काउन्सिल नोंदणी आवश्यक. अनुभव असल्यास प्राधान्य. | - | - | रु. २०००/- प्रती भेट/सत्र | • पदव्युत्तर पदवी/पदविका प्रमाणपत्र व गुणपत्रिका* <br>• महाराष्ट्र मेडिकल काउन्सिल रजिस्ट्रेशनचे प्रमाणपत्र <br>• अनुभव प्रमाणपत्र |
| ३ | वैद्यकिय अधिकारी (फिजिशिअन तज्ञ) (अर्धवेळ) | ०५ | किमान अहर्ता - MBBS MD (Medicine) तांत्रिक अहर्ता - महाराष्ट्र मेडिकल काउन्सिल नोंदणी आवश्यक. अनुभव असल्यास प्राधान्य. | - | - | रु. २०००/- प्रती भेट/सत्र | • पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रिका* <br>• महाराष्ट्र मेडिकल काउन्सिल रजिस्ट्रेशनचे प्रमाणपत्र <br>• अनुभव प्रमाणपत्र |
| ४ | वैद्यकिय अधिकारी (चर्मरोग तज्ञ) (अर्धवेळ) | ०७ | किमान अहर्ता - MBBS MD (Skin)/DVD तांत्रिक अहर्ता - महाराष्ट्र मेडिकल काउन्सिल नोंदणी आवश्यक. अनुभव असल्यास प्राधान्य. | - | - | रु. २०००/- प्रती भेट/सत्र | • पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रिका* <br>• महाराष्ट्र मेडिकल काउन्सिल रजिस्ट्रेशनचे प्रमाणपत्र <br>• अनुभव प्रमाणपत्र |
| ५ | स्टाफ नर्स (Nurse-Midwife) | ०५ | १२ वी (सायन्स) पास व जी.एन.एम. कोर्स शासन मान्य संस्थेमधून उत्तीर्ण | ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे | अ.जा. - १<br>अ.ज. - १<br>खुला - ३ | रु.१०,८००/- प्रती माह | • १२ वी पास प्रमाणपत्र व गुणपत्रिका <br>• जी.एन.एम. प्रमाणपत्र व गुणपत्रिका* <br>• महाराष्ट्र नर्सिंग काउन्सिल रजिस्ट्रेशनचे प्रमाणपत्र <br>• अनुभव प्रमाणपत्र |

* अंतीम वर्षाची गुणपत्रिका आवश्यक. सदर गुणपत्रिकेनुसार गुण देण्यात येतील.

## २) वयोमर्यादा

२.१) उपरोक्त अ.क्र. १ ते ४ या पदाकरीता वयाचे बंधन नाही.

२.२) अ.क्र. ५ या पदाकरीता उमेदवाराचे वय अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास किमान १८ वर्ष पुर्ण असणे आवश्यक आहे. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्ष व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्ष इतके राहील.

## ३) अर्ज, अर्हता, परिक्षा शुल्क इ. बाबत

३.१) ऑनलाईन पध्दतीशिवाय अन्य कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेला दिनांक व वेळेनंतर अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

३.२) अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी जाहीरातीचे दिनांकास, ज्या पदासाठी अर्ज केला आहे, त्या पदाच्या आवश्यकतेप्रमाणे शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर सर्व अर्हता धारण करणे/अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

३.३) उपरोक्त पदांसाठी विहित केलेले अर्ज https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर **दि. १८ जानेवारी २०१८ ते दि. २९ जानेवारी २०१८** पर्यंत उपलब्ध होतील.

३.४) आवेदन शुल्क :

अ) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी रक्कम रुपये ३००/- राहील.

ब) मागास / इतर प्रवर्गातील उमेदवारांसाठी रक्कम रुपये १५०/- राहील.

३.५) आवेदन शुल्क भरल्याबाबतची बॅंक चलनाची प्रत, कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

## ४) अर्ज भरणे व सादर करणेबाबत आवश्यक सुचना :

४.१) उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर जाऊन जाहीरात सविस्तर अभ्यासावी, भरावयाची सर्व माहिती स्वतःकडे उपलब्ध आहे याची खात्री करावी व नंतरच आपला अर्ज भरावा. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारले जातील.

४.२) पात्र उमेदवाराला वेब बेस्ड (Web based) ऑनलाईन अर्ज **दि. १८ जानेवारी २०१८ ते दि. २९ जानेवारी २०१८** या कालावधीतच https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक राहील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

४.३) अर्जात हेतुपुरस्पर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यातील नोंदीत अनाधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सदर करणे याकरीता शिक्षा करण्याचा तसेच प्रचलित कायदा व नियमाचे अनुशंगाने योग्य ती कारवाई करण्याचा अधिकार मा. आयुक्त, मनपा चंद्रपूर यांना राहील. तसेच विहित केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल.

४.४) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

४.५) वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, एस.एस. सी. परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.

**५) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची सर्वसाधारण प्रक्रिया खालीलप्रमाणे आहेः**

५.१) प्रोफाईल निर्मिती
५.२) अर्ज सादरीकरण
५.३) शुल्क भरणा

**५.१) प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्यावत करणे**

५.१.१) https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर वापरकर्त्याने प्रोफाईल निर्मिती करण्याकरीता नविन वापरकर्त्याची नोंदणी वर क्लिक केल्यानंतर यंत्रणा लॉग-इन पृष्ठ प्रदर्शित करेल. नविन खाते (वापरकर्त्याचे नाव Login व Password) निर्माण करण्यासाठी लॉग -इन पृष्ठाव्दारे विचारलेली सर्व माहिती भरुन नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी.

५.१.२) प्रोफाईलव्दारे माहिती भरतांना उमेदवाराने स्वतःचाच ईमेल आयडी, मोबाईल क्र. व जन्म दिनांक नोंदविणे आवश्यक आहे.

५.१.३) उमेदवारांकडे नित्य वापरत असेल असा ईमेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच भरती प्रक्रिये दरम्यानची इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्याकरणाने भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत सदर ईमेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वैध/कार्यरत राहणे आवश्यक आहे.

५.१.४) वरीलप्रमाणे प्रोफाईलची निर्मीती झाल्यानंतर वापरकर्त्याने स्वतःचा Login व Password व्दारे प्रवेश करुन प्रोफाईलमध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती, संपर्क तपशिल, इतर माहिती, शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. संदर्भातील तपशिलाची अचूक नोंद करावी.

**६) अर्ज सादरीकरण :**

६.१) https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर वापरकर्त्याने स्वतःचा युजर आयडी व पासवर्ड व्दारे यशस्वीरित्या प्रवेश (Login) केल्यानंतर 'ऑनलाईन अर्ज' येथे क्लीक करावे. जाहीरातीव्दारे प्रसिध्द केलेल्या पदाबाबतची यादी या ठिकाणी उपलब्ध होईल.

६.२) ज्या पदासाठी अर्ज करावयाचा असेल त्या जाहीरातीच्या उजवीकडे असलेल्या 'अर्ज करण्यासाठी येथे क्लीक करा' या ठिकाणी क्लिक करावे.

६.३) उमेदवाराच्या प्रोफाईलच्या आधारे यंत्रणा वैधता तपासेल. वापरकर्ता जाहीरातीतील निकष पूर्ण करीत असल्यास वापरकर्त्याला अर्ज सादर करता येईल.

६.४) जाहीरातीमध्ये नमूद केलेले निकष वापरकर्ता पूर्ण करीत नसल्यास 'माहिती संग्रहित होऊ शकत नाही' असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल. अर्ज यशस्वीरित्या सादर झाल्यानंतर 'तुमचा अर्ज यशस्वीरित्या जतन झाला' असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल.

६.५) ‘रक्कम भरा’ या पर्यायावर क्लिक करुन अर्जदाराला क्रेडीट कार्ड/डेबीट कार्ड/नेट बॅंकिंग व्दारे भरणा करता येईल. अथवा अर्जदार ऑनलाईन अर्ज सादर करुन भारतीय स्टेट बॅंकेत चलनाव्दारे शुल्काचा भरणा करण्याचा पर्याय स्विकारु शकेल.

**७) शुल्क भरणा :**

यशस्वीरीत्या अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता खाली नमूद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा

७.१) शुल्क भरण्याकरीता मुख्य पृष्ठाचा डाव्या भागावरील ‘माझे खाते’ या लिंक वर क्लिक करावे.

७.२) ‘माझे खाते’ या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या कार्यालयाचे नाव निवडल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदाची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर ‘Unpaid’ असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी ‘Pay now’ अशी लिंक उपलब्ध असेल.

७.३) ‘Pay now’ या लिंक वर क्लिक केल्यानंतर पुढील पर्याय उपलब्ध होतील अ) ऑनलाईन पेमेंट, ब) चलनाव्दारे क) क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड अथवा नेट बॅंकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करता येईल.

७.४) चलनाव्दारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणाऱ्या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बॅंकेच्या कोणत्याही शाखेत, बॅंकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

७.५) भारतीय स्टेट बॅंकेमध्ये चलनाव्दारे शुल्क भरावयाचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बॅंकेच्या कार्यालयीन वेळेत आवेदन शुल्क भरणे आवश्यक राहील.

७.६) चलनाव्दारे शुल्क स्विकारण्याकरीता भारतीय स्टेट बॅंक, उमेदवाराकडुन आवेदन शुल्क व्यतिरिक्त नियमानुसार सेवा शुल्क आकारेल. अशा प्रकारे उमेदवारास चलनाव्दारे शुल्क भरतांना आवेदन शुल्क + बॅंकेचे सेवा शुल्क भरावे लागतील.

**८. निवड प्रक्रियेची पध्दत :**

८.१) राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत भरण्यात येणा-या सर्व कर्मचाऱ्यांची निवड थेट मुलाखत पध्दतीने करण्यात येईल.

८.२) सदरील पदे ही राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) प्रकल्पा अंतर्गत राहतील. त्याचा चंद्रपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

८.३) एकुण पदांच्या संख्येमध्ये अथवा आरक्षणामध्ये बदल होऊ शकतो.

८.४) सदरील पदे ही निव्वळ कंत्राटी पध्दतीने तसेच केवळ प्रकल्प कालावधीपुरते भरावयाची असून, प्रकल्प बंद होताच सदरील पदे आपोआप संपुष्टात येतील.

८.५) उमेदवारांनी खालील कागदपत्रांसह मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहावे.
पासपोर्ट साईज फोटो-२, जन्म तारखेकरींता (वयाचा दाखला/१० वीची टीसी/जन्म प्रमाणपत्र) फोटो आयडी-मतदान ओळखपत्र/आधार कार्ड इत्यादी, रहिवाशी प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र, शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका, रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, बॅंकेचे चलान, मुलाखतीच्या अनुषंगाने इतर कागदपत्र मूळ व सत्यप्रत सांक्षांकित प्रत.

८.६) छाननीअंती पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी प्रवेश देण्यात येईल.

८.७) मुलाखतीसाठी एकास पाच (१:५) याप्रमाणे उमेदवारांना बोलविण्यात येईल.

८.८) जास्त उमेदवार आल्यास छाननी अंती एका पदास पाच उमेदवार याप्रमाणे पदानुसार पदवी/ पदविका/ जीएनएम इत्यादी पदांकरीता शैक्षणिक पात्रतेच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेतील गुणवत्तेनुसार मुलाखतीसाठी गुणांचा कट ऑफ लावण्यात येईल.

८.९) एकुण १०० गुणांची मुलाखत राहील.

अ) यामध्ये पदवी/ पदविका/ जीएनएम इ. च्या शेवटच्या वर्षाच्या गुणानुसार जास्तीत जास्त ८० गुण देण्यात येतील.

ब) शेवटच्या वर्षाचे गुण ग्राहय धरले जातील.

क) अर्हतेनुसार आवश्यक पदवी व्यतिरिक्त पदव्युत्तर पदवी / पदविका असल्यास अतिरिक्त जास्तीत जास्त ५ गुण देण्यात येतील.

ड) ५ गुण अनुभवावर आधारीत राहील. एक वर्षापेक्षा कमी अनुभव असल्यास ० गुण, १ वर्षे अनुभव असल्यास १ गुण आणि पुढे प्रत्येक वर्षासाठी एक याप्रमाणे जास्तीत जास्त ५ गुण राहतील. अनुभवाच्या बाबतीत फक्त शासकिय, निमशासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था अथवा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत असणारा संबंधीत पदासंबंधीचा अनुभव ग्राहय धरला जाईल.

इ) १० गुण विषय ज्ञानासाठी देण्यात येतील.

८.१०) मुलाखतीअंती पात्र उमेदवार व प्रतिक्षा यादीतील उमेदवार यांची यादी फलकावर शक्यतो त्याच दिवशी प्रसिध्द करण्यात येईल. त्याचप्रमाणे शक्यतो त्याच दिवशी नियुक्ती आदेश देण्यात येतील.

८.११) उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा राजकीय दबाव आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.

८.१२) सदरची भरती रद्द करणे अथवा स्थगित करणे तसेच निवड/नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्यावर कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्त तथा अध्यक्ष - निवड समिती (NUHM), चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर यांनी राखुन ठेवले आहेत.

**अति. आयुक्त**

**चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर**